## MAHARASHTRA ACT NO. IX OF 1970.

## THE SUITS VALUATION AND BOMBAY COURT-FEES (AMENDMENT) AND BOMBAY CITY CIVIL COURT DECREES AND ORDERS (VALIDATING) ACT, 1969.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ५ फेब्रुवारी १९७० रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. IX OF 1970.

## AN ACT FURTHER TO AMEND THE SUITS VALUATION ACT, 1887, AND THE BOMBAY COURT-FEES ACT, 1959, AND TO VALIDATE CERTAIN DECREES AND ORDERS OF THE BOMBAY CITY CIVIL COURT.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १२ फेब्रुवारी १९७० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९

**दाव्यांचे मूल्य ठरविण्याबाबत अधिनियम १८८७ आणि मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९, यांत आणखी सुधारणा करण्यासाठी आणि मुंबई शहर दिवाणी न्यायालयाच्या विवक्षित डिक्री आणि आदेश विधिग्राह्य करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, दिनांक १५ ऑक्टोबर १९६८ रोजी निर्णय दिलेले (सन १९६८ चा ए.ओ. क्रमांक २३७ आणि सन १९६८ चा ए.ओ. क्रमांक ३०१ यासह) सन १९६८ चे एकस्व पत्र अपील क्रमांक ४४ यामध्ये, मुंबई येथील न्यायमंडळाच्या उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, ज्याबाबतीत बृहन्मुंबईतील दाव्यांच्या विषयवस्तूच्या मूल्यांचा पैशामध्ये अंदाज करणे शक्य नसेल त्याबाबतीत, अशा दाव्यांचे पैशातील मूल्य, रु५,००० रुपयांपेक्षा कमी आहे असे म्हणता येणार नाही आणि असा दावा मुंबई शहर दिवाणी न्यायालयास (ज्याचा यापुढे "शहर न्यायालय" असा उल्लेख केलेला आहे) दाखल करून घेता येणार नाही; आणि असे दावे उच्च न्यायालयामध्येच दाखल केले पाहिजेत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना दाव्यांचे मूल्य ठरविण्याबाबत अधिनियम, १८८७, यातील कलम ९ अन्वये उच्च न्यायालयास प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, उच्च न्यायालयाने त्याची अधिसूचना क्रमांक पी-०१२६-५८, दिनांक ३० जुलै १९६९, याअन्वये असा नियम केला आहे की, ज्यांच्या विषयवस्तूचे न्यायालयाच्या मते, समाधानकारकरीतीने मूल्यांकन करणे शक्य नाही, असे विवक्षित विनिर्दिष्ट वर्गाचे दावे, उक्त, अधिनियमाच्या आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर अधिनियमितीच्या प्रयोजनांकरिता, त्यांची विषयवस्तू जणू तीनशे रुपये मूल्याची असल्याप्रमाणे समजण्यात आले पाहिजेत;

आणि ज्याअर्थी, उच्च न्यायालयाचा पूर्वोक्त न्यायनिर्णय, ज्यांच्या विषयवस्तूंचे समाधानकारकरीतीने मूल्यांकन करणे शक्य नाही अशा दाव्यांमध्ये याआधीच दिलेल्या डिक्री व आदेश यांना आणि प्रलंबित असतील असे दावे आणि कार्यवाही यांना आणि पूर्वोक्त उच्च न्यायालयाच्या नियमांमध्ये बसणार नाही, असे दावे आणि कार्यवाही दाखल करण्यास बाधक होत आहे;

**आणि ज्याअर्थी,** उच्च न्यायालय नियमात अंतर्भूत असलेल्या तत्वाचा अंगीकार करणे आणि सामान्यत: असे सर्व दावे आणि कार्यवाही बृहन्मुंबईतील शहर न्यायालयात दाखल होतील असे पूर्वलक्षी प्रभावासह अधिनियमित करणे आणि उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय दिला गेला त्यापूर्वी शहर न्यायालयाकडून अशा दाव्यांमध्ये आणि कार्यवाहीमध्ये देण्यात आलेल्या डिक्री आणि काढण्यात आलेले आदेश विधिग्राह्य करणे इष्ट आहे;

**आणि ज्याअर्थी,** ज्यांच्या बाबतीत सध्या नाममात्र फी द्यावी लागते आणि उपबंधाचा दुरुपयोग करण्यात येत आहे अशा विवक्षित अधिकार घोषणेच्या दाव्यांमध्ये समुचित यथामूल्य फी विहित करण्यासाठी मुंबई न्यायालय-शुल्क अधिनियम, १९५९, यातसुद्धा आणखी सुधारणा करणे इष्ट आहे;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना दाव्यांचे मूल्य ठरविण्याबाबत अधिनियम, १८८७, यात आणि मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९, यात अशा प्रकारे आणखी सुधारणा करणे आणि शहर न्यायालयाकडून देण्यात आलेल्या विवक्षित डिक्री आणि काढण्यात आलेले विवक्षित आदेश विधिग्राह्य करणे आणि आवश्यक त्या पूरक आणि आनुषंगिक तरतुदी करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या विसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास दाव्यांचे मूल्यांकन व मुंबई न्यायालय-शुल्क (सुधारणा) आणि मुंबई शहर दिवाणी न्यायालय यांच्या डिक्री आणि आदेश (विधिग्राह्य करण्याबाबत) अधिनियम, १९६९, असे म्हणता येईल.

(२) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेपासून तो अंमलात येईल.

सन १८८७ चा अधिनियम सात याच्या कलम ९ ची सुधारणा.

२. दाव्यांचे मूल्य ठरविण्याबाबत अधिनियम, १८८७ (ज्याचा यापुढे "दाव्यांचे मूल्य ठरविण्याबाबत अधिनियम" असा उल्लेख केलेला आहे), हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना त्याच्या कलम ९ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल आणि ते नेहमीकरिता दाखल केल्याचे मानण्यात येईल :—

विवक्षित दाव्यांचे मूल्य तीनशे रुपये असणे.

"९. न्यायालय-शुल्क अधिनियम, १८७०, याचे कलम ७, परिच्छेद (पाच) आणि (सहा) आणि परिच्छेद (दहा), खंड (ड) यामध्ये किंवा राज्याच्या कोणत्याही क्षेत्रात त्यावेळी अंमलात असलेल्या न्यायालय-शुल्क अधिनियमाच्या कोणत्याही तत्सम उपबंधांमध्ये नमूद केलेल्या दाव्यांखेरीज इतर दाव्यांच्या विषयवस्तूचे समाधानकारकरीत्या मूल्यांकन करणे शक्य नसेल त्याबाबतीत, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता आणि जर राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, उच्च न्यायालयाने तसा निदेश दिला असेल तर त्यासंबंधात उच्च न्यायालय विनिर्दिष्ट करील अशा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर अधिनियमितीच्या प्रयोजनांकरितासुद्धा अशा दाव्यांची विषयवस्तू ही जणू तीनशे रुपये मूल्याची असल्याप्रमाणे त्यांना मानण्यात येईल, आणि निकट पूर्ववर्ती कलमाचे उपबंध, हे त्यातील न्यायालय-शुल्क जणू संबंधित न्यायालय-शुल्क अधिनियमान्वये यथामूल्य देय असल्याप्रमाणे लागू होतील.".

दाव्यांचे मूल्य ठरविण्याबाबत अधिनियमाच्या कलम ९ अन्वये उच्च न्यायालयाने केलेला नियम निरसित करणे.

३. राज्य शासनाची पूर्वमंजुरी घेऊन, दाव्यांचे मूल्य ठरविण्याबाबत अधिनियम याच्या कलम ९ अन्वये उच्च न्यायालयाने केलेला आणि त्याची अधिसूचना क्रमांक पी-०१२६-५८, दिनांक ३० जुलै १९६९, यात प्रसिद्ध झालेला नियम निरसित झाल्याचे धरण्यात येईल.

४. मुंबई न्यायालय-शुल्क अधिनियम, १९५९ (यापुढे ज्याचा "मुंबई न्यायालय-शुल्क अधिनियम" असा उल्लेख केलेला आहे), याच्या कलम ६ मधील परिच्छेद (चार) मध्ये,—

सन १९५९ चा मुंबई अधिनियम छत्तीस याच्या कलम ६ ची सुधारणा.

(अ) उप-परिच्छेद (ह) नंतर पुढील उप-परिच्छेद समाविष्ट करण्यात येतील :—

"(हअ) कोणत्याही जंगम किंवा स्थावर मालमत्तेची कोणतीही विक्री किंवा विक्रीचा करार किंवा विक्रीच्या कराराची समाप्ती निरर्थक आहे अशी घोषणा केली जाण्यासाठी केलेल्या दाव्यांमध्ये— मालमत्तेच्या मूल्यावर बसविण्याजोग्या यथामूल्य फीच्या एक-चतुर्थांश ;

विक्री, विक्रीचा करार इ. निरर्थक करण्याबाबत.

(हब) कोणत्याही जंगम किंवा स्थावर मालमत्तेच्या सक्तीच्या संपादनाच्या कार्यवाही निरर्थक आहेत अशी घोषणा केली जावी यासाठी केलेल्या दाव्यांमध्ये — मालमत्तेच्या मूल्यावर बसविण्याजोग्या यथामूल्य फीच्या एक चतुर्थांश ; " ;

संपादन कार्यवाही निरर्थक केली जावी याबाबत.

(ब) उप-परिच्छेद (जे) मधील "—तीस रुपये" या शब्दांऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"—विषयवस्तूची रक्कम किंवा मूल्य जणू तीनशे रुपये असल्याप्रमाणे, देय असलेली यथामूल्य फी ; ".

५. मुंबई न्यायालय-शुल्क अधिनियम, यास जोडलेल्या अनुसूची २ मधील, नोंद २३, परिच्छेद (फ) यात स्तंभ ३ मध्ये "तीस रुपये" या मजकुराऐवजी "विषयवस्तूची रक्कम किंवा मूल्य जणू तीनशे रुपये असल्याप्रमाणे देण्याजोगी यथामूल्य फी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५९ चा अधिनियम छत्तीस याच्या अनुसूची २ ची सुधारणा.

६. (१) कोणत्याही न्यायालयाच्या डिक्रीमध्ये, न्यायनिर्णयात, किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्याच्या विषयवस्तूचे, मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८, याच्या कलम ३ अन्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमितीन्वये शहर न्यायालय आपल्या अधिकारितेचा वापर करीत असताना किंवा वापर करीत असल्याचे अभिप्रेत असताना ज्या दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या विषयवस्तूचे पैशामध्ये मूल्यमापन करणे शक्य नव्हते किंवा तिच्या किमतीचा पैशामध्ये अंदाज करणे शक्य नव्हते, अशा कोणत्याही दाव्यात किंवा इतर कार्यवाहीत (यापुढे निर्देशिलेल्या कारणावरून वादपत्र, विनंतीअर्ज किंवा अर्ज परत करण्यासंबंधी दिलेल्या आदेशाव्यतिरिक्त) दिलेली कोणतीही डिक्री किंवा काढलेला कोणताही आदेश विधीग्राह्य व प्रभावी असेल आणि तो विधीमान्य व प्रभावी असल्याचे नेहमीकरिता मानण्यात येईल आणि त्या दाव्यांच्या किंवा इतर कार्यवाहीच्या विषयवस्तूचे पैशात मूल्यमापन करता येण्यासारखे नव्हते किंवा त्याच्या किमतीचा पैशात अंदाज करणे शक्य नव्हते व म्हणून शहर न्यायालयास तो दावा किंवा ती कार्यवाही दाखल करून घेण्यास किंवा यथास्थिती ती डिक्री किंवा तो आदेश देण्यास किंवा काढण्यास अधिकारिता नव्हती, केवळ याच कारणावरून (यापुढे ज्याचा या कलमात "उक्त कारण" असा निर्देश करण्यात आला आहे) कोणत्याही न्यायालयात हरकत घेण्यात येणार नाही.

विवक्षित कार्यवाही विधीग्राह्य करणे, तिचे पुनःस्थापन व बदली करणे.

(२) (अ) जर या अधिनियमाच्या प्रारंभाचे वेळी शहर न्यायालयात असे कोणतेही दावे किंवा कार्यवाही अनिर्णित असेल तर असा प्रारंभ होण्याच्या लगतपूर्वीच्या त्यांच्या अवस्थेपासून ते (दावे किंवा

३९



कार्यवाही) चालू करण्यात येतील व त्या न्यायालयाकडून त्यांची सुनावणी केली जाईल व ते निकालात काढले जातील.

(ब) कोणतेही वादपत्र, विनंतीअर्ज किंवा अर्ज, उक्त कारणावरून या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी शहर न्यायालयाने काढलेल्या आदेशाद्वारे, ते समुचित न्यायालयास सादर केले जाण्यासाठी, परत करण्याचा निदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत असा आदेश निरर्थक असेल व तो परिणामक्षम असणार नाही; आणि ते वादपत्र, विनंतीअर्ज किंवा अर्ज परत करण्यात आले असेल त्याबाबतीत मुदतमर्यादा अधिनियम, १९६३, यात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमितीत तद्विरुद्ध काहीही असले तरीही, अशा आदेशाद्वारे जिच्यावर बाधक परिणाम झाला असेल अशा कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाच्या प्रारंभापासून सहा महिन्याच्या आत त्याच्याकडे (न्यायालयाकडे) अर्ज केल्यावर, शहर न्यायालय, ते वादपत्र, विनंती अर्ज किंवा अर्ज परत स्वीकारील व असा आदेश दिल्याच्या लगतपूर्वी तो दावा किंवा कार्यवाही ज्या अवस्थेत असेल त्या अवस्थेपासून तो दावा किंवा ती कार्यवाही सुरू करील आणि वादपत्र, विनंतीअर्ज किंवा अर्ज परत करण्याचा आदेश दिलेला असताही या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी परत करण्यात आला नसेल त्याबाबतीत शहर न्यायालय पुढील कोणत्याही अर्जाविना तो दावा किंवा ती कार्यवाही, असा आदेश काढण्यात आल्याच्या लगतपूर्वीच्या (त्याच्या) अवस्थेपासून पुढे चालू करील.

(क) ज्यांच्या विषयवस्तूचे पैशात मूल्यमापन करता येण्यासारखे नाही किंवा ज्यांच्या किमतीचा पैशात अंदाज करणे शक्य नाही, असे कोणतेही दावे किंवा कार्यवाही या अधिनियमाच्या प्रारंभाचे वेळी उच्च न्यायालयात दाखल करण्यात आले असतील व अनिर्णित असतील तर ते शहर न्यायालयाकडे बदली करण्यात येतील व शहर न्यायालयाकडून त्यांची सुनावणी होईल व ते निकालात काढले जातील; आणि शहर न्यायालयास, जणू काही ते त्या न्यायालयात, मूलतः दाखल करण्यात आले असल्याप्रमाणे त्यांच्यासंबंधी सर्व शक्ती व अधिकारिता असतील. कोणताही अंतरिम अनुतोष देणारा, उच्च न्यायालयाने दिलेला कोणताही आदेश हा, जणू तो शहर न्यायालयाकडून देण्यात आला असल्याप्रमाणे लागू होईल.

(३) (अ) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निकालात काढण्यात आलेल्या कोणत्याही अपीलात, शहर न्यायालयाने दिलेली कोणतीही डिक्री किंवा काढलेला कोणताही आदेश अपील न्यायालयास उक्त कारणावरून अवैध असल्याचे आढळून आले असेल आणि ते वादपत्र, विनंती अर्ज किंवा अर्ज समुचित न्यायालयास सादर करण्यासाठी पक्षकारास परत करण्यात यावे असा अपील न्यायालयाने आदेश दिला असेल, तर त्याबाबतीत असा आदेश निरर्थक असेल व तो परिणामक्षम असणार नाही व वादपत्र, विनंतीअर्ज किंवा अर्ज परत करण्यात आले असेल त्याबाबतीत मुदतमर्यादा अधिनियम, १९६३, यात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमितीत तद्विरुद्ध काहीही असले तरी, अपील न्यायालय, अशा आदेशाद्वारे ज्या व्यक्तीवर बाधकरीतीने परिणाम झालेला असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून, या अधिनियमाच्या प्रारंभापासून सहा महिन्यांच्या आत त्याच्याकडे (न्यायालयाकडे) अर्ज करण्यात आल्यावर ते वादपत्र, विनंतीअर्ज किंवा अर्ज परत स्वीकारील आणि असा आदेश करण्यात आल्याच्या लगतपूर्वीच्या अवस्थेपर्यंत त्या अपीलाचे पुनःस्थापन करील व त्या अवस्थेपासून ते अपील चालू करील आणि ते वादपत्र, विनंतीअर्ज किंवा अर्ज, परत करण्याचा आदेश दिलेला असतानाही, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी ते परत करण्यात आले नसेल त्या बाबतीत, अपील न्यायालय पुढे कोणत्याही अर्जाविना असा आदेश काढण्यात आल्याच्या लगतपूर्वीच्या अवस्थेपासून त्या अपीलावरील कार्यवाही चालू करील.

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निकालात काढण्यात आलेल्या कोणत्याही अपीलात, उक्त कारणावरून शहर न्यायालयाने वादपत्र, विनंतीअर्ज किंवा अर्ज परत करण्यासंबंधी काढलेला आदेश अपील न्यायालयाकडून कायम करण्यात आला असेल त्याबाबतीत, अपील न्यायालयाकडून करण्यात आलेला आदेश निरर्थक होईल व तो परिणामक्षम राहाणार नाही; आणि ते वादपत्र, विनंती अर्ज किंवा अर्ज परत करण्यात आले असेल त्याबाबतीत, शहर न्यायालय, मुदतमर्यादा अधिनियम, १९६३, यात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमितीत तद्विरुद्ध काहीही असले तरी अशा आदेशाद्वारे बाधक परिणाम झालेल्या व्यक्तीकडून, या अधिनियमाच्या प्रारंभापासून सहा महिन्याच्या आत त्याच्याकडे (न्यायालयाकडे) अर्ज करण्यात आल्यावर ते वादपत्र, विनंती अर्ज किंवा अर्ज परत स्वीकारील आणि

परत करण्यासंबंधीचा आदेश काढण्यात आल्याच्या लगतपूर्वीच्या अवस्थेपासून तो दावा किंवा ती कार्यवाही चालू करील व ते वादपत्र, विनंतीअर्ज किंवा अर्ज परत करण्याचा आदेश दिलेला असतानाही या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी परत करण्यात आले नसेल त्याबाबतीत, शहर न्यायालये, पुढील कोणत्याही अर्जाविना ते परत करण्यासंबंधीचा आदेश काढण्यात आल्याच्या लगतपूर्वीच्या अवस्थेपासून तो दावा किंवा ती कार्यवाही चालू करील.

७. या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ज्या दाव्यांच्या किंवा कार्यवाहीच्या व्यावृत्ती.
विषयवस्तूचे पैशात मूल्यमापन करता येण्यासारखे नव्हते किंवा ज्यांच्या विषयवस्तूच्या किंमतीचा पैशामध्ये अंदाज करणे शक्य नव्हते असे जे दावे किंवा ज्या कार्यवाही १५ ऑक्टोबर १९६८ रोजी किंवा तदनंतर उच्च न्यायालयात दाखल करण्यात आले व या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी जे त्या न्यायालयाने निकालात काढले त्या दाव्यांमध्ये किंवा कार्यवाहीमध्ये देण्यात आलेल्या कोणत्याही डिक्रींच्या किंवा काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशांच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

**वा. ना. पंडित,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.